मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in | पुणे, पिंपरी-चिंचवड | गुरुवार, दिनांक १ फेब्रुवारी २०२४ । पान १

# ‘आयुष्मान भव’ मोहिमेंतर्गत १८ वर्षावरील पुरुषांचा पालिकेच्या रुग्णालयात मोफत उपचार!

## प्रशासक शेखर सिंह यांनी स्थायी समिती बैठकीत दिली मान्यता

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
केंद्र शासनाचा महत्वकांक्षी उपक्रम ''आयुष्मान भव'' मोहिमेंतर्गत १८ वर्षे व त्यावरील सर्व पुरूषांच्या आरोग्य तपासणीकामी महापालिकेच्या रुग्णालय तसेच दवाखान्यांमधील बाह्यरुग्ण विभागातील सर्व केसपेपर, औषधोपचार आणि तपासण्या मोफत करण्यासाठी आज प्रशासक शेखर सिंह यांनी स्थायी समिती बैठकीत मान्यता दिली. या विषयासह तळवडे येथील आ. क्र. १/५२ व १/५३ येथे बायोडायव्हर्सिटी पार्क आरक्षण विकसित करण्यासाठी तसेच पिंपरी चिंचवड महापालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था कासारवाडी (मुलींचे) येथे डिजीटल स्मार्ट रूम आणि



आवश्यक अनुषंगिक बाबी यांचे कामकाज टर्न की प्रोजेक्टनुसार करण्यासाठी येणाऱ्या खर्चास आणि स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक असलेल्या विविध विषयांना प्रशासक सिंह यांनी मंजूरी दिली.महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात प्रशासक शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, उल्हास जगताप तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. निदेशक पदावर तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यासाठी तसेच महापालिकेच्या प्रभाग क्र. १० मध्ये विद्यानगर, संभाजीनगर, शाहूनगरमध्ये डांबरीकरणाची कामे करण्यासाठी येणाऱ्या खर्चास बैठकीत मान्यता देण्यात आली.वाकडमध्ये जलनि:सारण विषयक देखभाल दुरूस्तीची कामे करण्यासाठी तसेच महापालिकेच्या प्रभाग क्र. २४ थेरगाव येथील आवश्यक त्या ठिकाणी स्टोर्म वॉटर लाईन टाकण्यासाठी आणि प्रभाग क्र. १५ मधील सार्वजनिक शौचालये यांची यांत्रिक पद्धतीने व मनुष्य बळाद्वारे दैनंदिन साफसफाई, देखभाल करण्यासाठी येणाऱ्या खर्चास बैठकीत मान्यता देण्यात आली.महापालिकेच्या रुग्णालयांच्या परिसरात जेनेरीक औषधी दुकान सुरू करण्यासाठी लागणारी जागा भाडेतत्वावर व इतर सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तसेच महापालिका प्रभाग क्र. १० मोरवाडी, मोरवाडी गावठाण व औद्योगिक परिसरात व इतर परिसरातील डांबरी रस्त्यांची दुरूस्तीची कामे करण्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.महापालिकेच्या प्रभाग क्र. १४ मधील मुख्य अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करण्यासाठी तसेच मनपाचे प्रभाग क्र. १० संभाजीनगर व इतर परिसरामध्ये मुख्य व अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी आणि महापालिका परिसरातील मतिमंद व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या विविध क्रिडा स्पर्धा २०२३-२४ आयोजित करण्यासाठी येणाऱ्या खर्चास बैठकीत मान्यता देण्यात आली. असोसिएशन ऑफ टेनिस प्लेअर्स, वुमन्स टेनिस असोसिएशन स्पर्धेच्या आयोजनाकरीता अनुदान देण्यासाठी महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत प्रशासक यांची मान्यता घेणेकामी शिफारस करण्यासाठी बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच मोशी येथील गट क्र. ७५ ते १३७ पर्यंतचा ३० मी. डी. पी रस्ता विकसित करण्यासाठी आणि नॅकोफ इंडिया लिमीटेड या संस्थेस अमृत स्टोअर्सच्या धर्तीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रुग्णालयांच्या परिसरात जेनेरीक औषधी दुकान सुरू करण्यासाठी लागणारी जागा भाडेतत्वावर व इतर सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी येणाऱ्या खर्चास आज बैठकीत मान्यता देण्यात आली.

# रस्ता बाधित तसेच आरक्षण बाधितांना घरे मिळावीत

## माजी नगरसेविका मीनल यादव यांची आयुक्तांकडे मागणी

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
आकुर्डी, मोहननगर येथील प्रधानमंत्री आवास योजनेत रस्ता बाधित तसेच आरक्षण बाधितांना घरे मिळावीत अशी मागणी माजी नगरसेविका मीनल यादव यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे केली आहे.मीनल यादव यांनी महापालिका आयुक्त शेखर



सिंह यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मोहननगर परिसरातील अनेक नागरिकांची घरे रस्त्यामध्ये गेलेली आहेत. या नागरिकांनी आकुर्डी (मोहननगर) येथील पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या घरांसाठी अर्ज केलेला होता. परंतु नुकत्याच झालेल्या लकी ड्रॉ मध्ये त्यांचा नंबर लागलेला नाही. हे नागरिक अनेक वर्षापासून घरापासून वंचित आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या घरकुल योजनेत, प्राधिकरण योजनेत, पंतप्रधान आवास योजनेत या लोकांनी अनेक वेळा अर्ज करून देखील ते घरापासून वंचित आहेत.

पूर्वी यासंदर्भात आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्याकडे सुद्धा वारंवार निवेदन देऊन पाठपुरावा केला होता. आता या गोरगरीब लोकांना उर्वरित फ्लॅटमध्ये स्वतःचे घर मिळवून देऊन त्यांना न्याय द्यावा, अशी मागणी मीनल यादव यांनी केली आहे. आयुक्तांना निवेदन देतेवेळी भोसरीचे आमदार महेश लांडगे, माजी नगरसेविका मीनल विशाल यादव तसेच रस्ता बाधित नागरिक सर्व उपस्थित होते.

# पिंपरी चिंचवड महापालिकेत नोकरीची संधी!

## दर बुधवारी उमेदवारांची घेतली जाणार मुलाखत

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
सरकारी नोकरीच्या शोधात असलेल्यांसाठी नोकरीची सुवर्णसंधी आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत अंतर्गत विविध पदांसाठी भरती केली जाणार आहे. यामध्ये फिजिशियन, प्रसूती आणि स्त्रीरोग तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ, नेत्ररोग तज्ज्ञ, त्वचारोग तज्ज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ, ईएनटी तज्ज्ञ अशा विविध पदांच्या एकूण ६५ रिक्त जागांची भरती होणार आहे. पदांनुसार पात्र असणाऱ्या उमेदवारांकरिता मुलाखती आयोजित करण्यात आलेल्या आहेत. इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी मुलाखतीकरिता हजर राहावे. उमेद्वारांकरिता मुलाखती आठवडयातील दर बुधवारी सकाळी-११.०० वाजता मुलाखती अयोजित करण्यात येत आहेत.पिंपरी चिंचवड महानगरपालिके द्वारे फिजिशियन, प्रसूती आणि स्त्रीरोग तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ, नेत्ररोग तज्ज्ञ, त्वचारोग तज्ज्ञ, मानसोपचार तज्ञ, ईएनटी तज्ज्ञ या पदांसाठी भरती आयोजित केली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत अंतर्गत एकूण ६५ जागांसाठी भरती होणार आहे.




प्रसूती आणि स्त्रीरोगतज्ज्ञ – एमडी/एमएस स्त्रीरोगतज्ज्ञ/डीजीओ/डीएनबीबालरोगतज्ज्ञ – एमडी पीईडीएस/ डीसीएच/ डीएनबीनेत्रचिकित्सक – एमएस नेत्रतज्ज्ञ/ डीओएमएसत्वचारोग तज्ञ – एमडी (त्वचा/ व्हिडी), डीव्हिडी, डीएनबीमानसोपचारतज्ज्ञ -एमडी मानसोपचार/ डीपीएम/डीएनबी ईएनटी विशेषज्ज्ञ- एमएस ईनटी / डीओआरएल/ डीएनबीपिंपरी चिंचवड महानगरपालिकेत अंतर्गत भरती केल्या जाणाऱ्या पदांकरीता निवड प्रक्रिया मुलाखतीच्या आधारावर केली जाईल.झउचउ तरलरपलू २०२४ : मुलाखतीचा पत्ता पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवन, वैद्यकीय विभाग, दुसरा मजला, पिंपरी-४११ ०१८मुलाखतीची तारीख आणि वेळपिंपरी चिंचवड महानगरपालिकेत अंतर्गत भरतीसाठी उमेदवारांकरिता मुलाखती आठवडयातील दर बुधवारी सकाळी-११.०० वाजता मुलाखती अयोजित करण्यात येत आहेत. या पदांसाठी इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी मुलाखतीकरिता जाहिरातीमध्ये दिलेल्या वेळेत आणि पत्यावर हजर राहावे. सरकारी नोकरीच्या शोधात असलेल्यांसाठी नोकरीची सुवर्णसंधी आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत अंतर्गत विविध पदांसाठी भरती केली जाणार आहे. यामध्ये फिजिशियन, प्रसूती आणि स्त्रीरोग तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ, नेत्ररोग तज्ज्ञ, त्वचारोग तज्ज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ, ईएनटी तज्ज्ञ अशा विविध पदांच्या एकूण ६५ रिक्त जागांची भरती होणार आहे. पदांनुसार पात्र असणाऱ्या उमेदवारांकरिता मुलाखती आयोजित करण्यात आलेल्या आहेत. इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी मुलाखतीकरिता हजर राहावे. उमेद्वारांकरिता मुलाखती आठवडयातील दर बुधवारी सकाळी-११.०० वाजता मुलाखती अयोजित करण्यात येत आहेत.

### पदाचे नाव – पद संख्या

- फिजिशियन – ०९
- प्रसूती आणि स्त्रीरोग तज्ज्ञ -०९
- बालरोग तज्ज्ञ – ०९
- नेत्ररोग तज्ज्ञ -०९
- त्वचारोग तज्ञ -०९
- मानसोपचार तज्ज्ञ – १०
- ईएनटी तज्ज्ञ -१०

# पिंपरी चिंचवड मधील २७ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

## राज्याच्या विविध भागामधून २४ पोलीस निरीक्षक पिंपरी चिंचवड शहरात

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहरातील २७ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या झाल्या आहेत. तसेच राज्याच्या विविध भागामधून २४ पोलीस निरीक्षक पिंपरी चिंचवड शहरात आले आहेत.
स्वग्राम जिल्ह्यात नेमणुकीस असलेले पोलीस अधिकारी व ३० जून २०२४ पर्यंत किंवा त्यापूर्वी चार वर्षांपैकी तीन वर्ष कार्यकाल पूर्ण झालेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. बदलीवर हजर झालेल्या पोलीस निरीक्षकांना घटकांतर्गत पदस्थापना देताना त्यांची मूळ जिल्ह्यात नेमणूक झाली असेल तर कार्यकारी पद देता येणार नसल्याचे बदली आदेशात म्हटले आहे. विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना) के एम मल्लिकार्जुन प्रसन्ना यांनी मंगळवारी (दि.३०) बदलीचे आदेश दिले आहेत.अजित लकडे (सोलापूर शहर)शिवाजी गवारे (ठाणे शहर) सुनील गोडसे (नागपूर शहर)शंकर डामसे (ठाणे शहर)शैलेश गायकवाड (नागपूर शहर)दिलीप शिंदे (सोलापूर शहर) शंकर बाबर (ठाणे शहर) ज्ञानेश्वर साबळे (ठाणे शहर)रणजीत सावंत (नागपूर शहर)दिपाली धाडगे (नागपूर शहर) प्रसाद गोकुळे (नागपूर शहर)सुनील पिंजन (नागपूर शहर)रामचंद्र घाडगे (नागपूर शहर) विश्वजीत खुळे (नागपूर शहर)मच्छिंद्र पंडित (नागपूर शहर)बाळकृष्ण सावंत (नागपूर शहर) प्रकाश जाधव (नागपूर शहर)दीपक साळुंखे (ठाणे शहर)शहाजी पवार (सोलापूर शहर) किशोर पाटील (नागपूर शहर)सुनील तांबे (ठाणे शहर)रूपाली बोबडे (नागपूर शहर)अरविंद पवार (नागपूर शहर)युनुस मुलानी (नागपूर शहर) अनिल देवडे (छत्रपती संभाजी नगर शहर)दशरथ वाघमोडे (गडचिरोली)



# जातीव्यवस्था टिकावी आरक्षण संपवावे

## करवीर पीठाचे शंकराचार्य विद्यानृसिंह भारती यांचे वक्तव्य

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
सर्वांच्या कल्याणासाठी जातीव्यवस्था टिकावी मात्र आरक्षण संपवावे असे करवीर पीठाचे शंकराचार्य विद्यानृसिंह भारती स्वामी शंकराचार्य यांनी म्हटले. चुकीच्या वापरांमुळे जातीव्यवस्था वाईट ठरली असा दावा त्यांनी केला. शंकराचार्यांच्या या वक्तव्यामुळे वाद होण्याची शक्यता आहे. श्री गंगाधर स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त डीएम फाउंडेशनतर्फे पुण्यात आयोजित सप्ताहाचे व व्याख्यानमालेचे उद्घाटन शंकराचार्य यांच्या हस्ते झाले.'जात असावी की नसावी' या व्याख्यानमालेत बोलताना शंकराचार्यांनी धर्मशास्त्र, जातीव्यवस्था, समाजातील अनिष्ट चालीरीती यावर त्यांची मत मांडली. त्यांनी म्हटले की, जातीव्यवस्था सर्वांच्या कल्याणासाठी आहे. मात्र, अनेकांनी स्वार्थासाठी चुकीच्या पद्धतीने जातिव्यवस्थेचा वापर केला.




त्यामुळे धर्मशास्त्र आणि समाजव्यवस्थेचे महत्वाचे अंग असलेली जातीव्यवस्था वाईट ठरली. मानवाच्या कल्याणासाठी जातीव्यवस्था टिकवणे आणि योग्य पद्धतीने त्याचे अनुकरण करणे समाज व देशहिताचे आहे,'' असे करवीर पीठाचे शंकराचार्य विद्यानृसिंह भारती स्वामी यांनी म्हटले. टिळक मार्गावरील मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात ब्राह्मण महासंघाचे आनंद दवे, पत्रकार दत्ता जाधव, फाउंडेशनचे विजय देशमुख महाराज यांनी देखील विचार मांडले. शंकराचार्य म्हणाले, ''समाज सुशिक्षित होतोय; मात्र सुसंस्कृतपणा विसरत चालला आहे. सनातन वैदिक संस्कृतीने मानवाच्या कल्याणासाठी जातिव्यवस्थेचे महत्व अधोरेखित केले आहे. धर्मशास्त्राचे पालन न केल्याने अनेक समस्या उद्भवल्या आहेत. आपण हक्क मागतो; पण कर्तव्य सोयीस्कर विसरतो. जात घालवण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा ती अधिक प्रभावी होत जाते. जातिव्यवस्थेचे कवच असल्यानेच ब्रिटिशांना धर्म फोडता आला नाही. आरक्षण व्यवस्था सर्वांसाठी घातक आहे. समाजाची घडी चांगली राहण्यासाठी जातिव्यवस्था टिकवली पाहिजे असं त्यांनी म्हटले. आनंद दवे म्हणाले, ''गेल्या सहा महिन्यात जातीय वातावरण अधिक गडद झाले. जातीचा उपयोग करून राजकारण्यांनी समाजाची केलेली विभागणी लोकशाहीला मारक आहे. आरक्षणाला विरोध करणारे मनोज जरांगे आज आरक्षणासाठी आरपारची लढाई करत आहेत. सध्याच्या भूमिकेने भविष्यात मराठा अस्तित्वात राहिल की नाही, याची शंका वाटते. गुणवत्तेला आरक्षणाचा पर्याय अयोग्य असून, जात घालवण्यासाठी आरक्षण रद्द केले पाहिजे अशी मागणी दवे यांनी केली. जातीच्या भांडणात धर्माचे मोठे नुकसान होते. हिंदू धर्माच्या नावावर एकत्रित आलेला समाज फोडण्याचे काम जातीयवादी लोक करतात, हे दुर्दैवी असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. दत्ता जाधव म्हणाले, ''जात नसावी, असे आपण म्हणतो. मात्र, स्वार्थासाठी जातीचे अस्त्र वापरतो. राजकीय नेत्यांनी जातीच्या उतरंडी अधिक मजबूत केल्या आहेत. शिक्षणामुळे जातीच्या चौकटी दूर व्हायला हव्या; मात्र राजकीय गणिते जुळवण्यासाठी जातीचे समीकरण केले जाते. त्यातून जात अधिक स्पष्टपणे पुढे येते. गेल्या काही काळात जाती-जातीतील रेषा अधिक ठळक होत आहेत.'' विजय देशमुख महाराज म्हणाले, ''जातीअंताचा लढा अनेक वर्षांपासून सुरु आहे. जात संपवण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करायला हवेत. माणूस म्हणून जगण्याची आणि समाजाला एकसंध ठेवण्याची गरज असताना जातीच्या नावावर होणार अवडंबर अयोग्य आहे.


### धर्माचे पालन न केल्याने समस्या

» देशमुख महाराज फाउंडेशनच्या माध्यमातून मानवता धर्म जनमानसात रुजवण्यासाठी प्रयत्नशील आहेत, असेही त्यांनी म्हटले. 'जात असावी की नसावी' या व्याख्यानमालेत बोलताना शंकराचार्यांनी धर्मशास्त्र, जातीव्यवस्था, समाजातील अनिष्ट चालीरीती यावर त्यांची मत मांडली. त्यांनी म्हटले की, जातीव्यवस्था सर्वांच्या कल्याणासाठी आहे. मात्र, अनेकांनी स्वार्थासाठी चुकीच्या पद्धतीने जातिव्यवस्थेचा वापर केला. त्यामुळे धर्मशास्त्र आणि समाजव्यवस्थेचे महत्वाचे अंग असलेली जातीव्यवस्था वाईट ठरली. टिळक मार्गावरील मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात ब्राह्मण महासंघाचे आनंद दवे, पत्रकार दत्ता जाधव, फाउंडेशनचे विजय देशमुख महाराज यांनी देखील विचार मांडले.सनातन वैदिक संस्कृतीने मानवाच्या कल्याणासाठी जातीव्यवस्थेचे महत्व अधोरेखित केले आहे. धर्मशास्त्राचे पालन न केल्याने अनेक समस्या उद्भवल्या आहेत.

# शरद मोहोळ हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी सापडला

## पुणे पोलिसांनी नाशिकमधून पाठलाग करत अटक केली

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
गँगस्टर शरद मोहोळ हत्या प्रकरणात पुणे पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. शरद मोहोळ हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी गणेश मारणे याच्यासह तिघांना पुणे पोलिसांनी थरारक पाठलाग करून पकडले. गणेश मारणे हा शरद मोहोळ हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी असून तो गेल्या अनेक दिवसांपासून फरार होता. पुणे पोलीस गुन्हे शाखेने नाशिक रोड येथून अटक केली.
मोहोळ हत्याप्रकरणातील मुख्य सुत्रधार गणेश मारणे, विठ्ठल शेलार यांच्यासह १६ जणांवर मोक्का लावण्यात आला. पुण्यातील कुख्यात गुंड शरद मोहोळची ५ जानेवारी रोजी दिवसाढवळ्या गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. या घटनेने पुण्यासह राज्यात एकच खळबळ उडाली होती. शरद मोहोळ हत्या प्रकरणात २० हून अधिकजणांना अटक



करण्यात आली आहे. शरद मोहोळची हत्या झाल्यानंतर काही तासांमध्ये सात जणांना अटक करण्यात आली. त्यानंतर १५ जानेवारी रोजी पुणे पोलीसांच्या गुन्हे शाखेने शरद मोहोळ हत्या प्रकरणात दहा जणांना पनवेल आणि वाशीमधून अटक केली. विठ्ठल शेलार, रामदास उर्फ वाघ्या मारणे यासह दहा जणांना गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून अटक केली होती. आतापर्यंत मुन्ना पोळेकर हा मुख्य आरोपी असल्याचे मानले जात होते. पोळेकरने इतर साथीदारांसोबत या हत्तेचा कट रचल्याचे प्राथमिक तपासातून समोर आले होते. मात्र, पोलीस तपासात अनेक गोष्टी समोर आल्यानंतर अनेकजण पोलिसांच्या रडारवर आले आहेत. पुणे पोलिसांनी आज नाशिकमधून या प्रकरणातील मुख्य आरोपी असलेला गणेश मारणे याला अटक केली आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने शरद मोहोळ हत्येप्रकरणी जवळपास २४ जणांच्या मुसक्या आवळल्या आहेत. साहिल उर्फ मुन्ना संतोष पोळेकर, नामदेव महिपती कानगुडे, अमित ऊर्फ अमर मारुती कानगुडे, चंद्रकांत शाहू शेळके, विनायक संतोष गव्हाणकर, विठ्ठल किसन गांदले, ॲड. रवींद्र पवार, ॲड. संजय उडान, विठ्ठल शेलार, रामदास ऊर्फ वाघ्या मारणे, धनंजय मारुती वटकर, सतीश संजय शेडगे, नितीन अनंता खैरे, आदित्य विजय गोळे, संतोष दामोदर कुरपे यांना बेड्या ठोकल्या आहेत.

# 'महाराष्ट्र ड्रोन मिशन' अंतर्गत राज्यात आता ड्रोन केंद्रांचे जाळे

## सहा विभागीय, बारा जिल्हास्तरीय ड्रोन केंद्रांची निर्मिती प्रस्तावित

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राज्य सरकारने 'महाराष्ट्र ड्रोन मिशन' राबवण्यास मंजुरी दिली आहे. त्या अंतर्गत राज्यात ड्रोन केंद्रांचे जाळे निर्माण करण्यात येणार असून, सहा विभागीय आणि बारा जिल्हास्तरीय ड्रोन केंद्र निर्माण केली जाणार आहेत. या ड्रोन केंद्राचे मुख्यालय आयआयटी मुंबईमध्ये उभारले जाणार आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने याबाबतचा निर्णय घेतला. ड्रोन तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे औद्योगिक क्षेत्रात मोठे बदल होत आहेत. तसेच प्रशासकीय क्षेत्रातही हे



तंत्रज्ञान उपयुक्त ठरते. या अनुषंगाने महाराष्ट्राला ड्रोन हब म्हणून विकसित करण्याच्या उद्देशाने आयआयटी मुंबईने महाराष्ट्र ड्रोन मिशन हा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून उच्च व तंत्रशिक्षण विभागाला सादर केला.या अहवालात ड्रोन अभियानाची उद्दिष्टे, ड्रोन तंत्रज्ञानाच्या उपयोगाच्या संभाव्य शक्यता, आव्हाने, ड्रोन वापरासंदर्भातील प्रचलित नियम आणि कायदे आदींचा समावेश आहे. त्या अनुषंगाने राज्यातील अभियांत्रिकी शैक्षणिक आणि संशोधन संस्था, शासकीय यंत्रणा, औद्योगिक आस्थापना यांच्या सहभागातून ड्रोन तंत्रज्ञान विकसित करण्याचे प्रस्तावित आहे. विविध प्रशासकीय विभागांकडून त्यांच्या समस्येनुसार आणि प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार अर्थसंकल्पीय तरतुदीद्वारे निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. तर पाच वर्षांत हा प्रकल्प आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण करण्याचे नियोजन आहे.या प्रकल्पाद्वारे ड्रोन तंत्रज्ञानाशी संबंधित परिसंस्था निर्माण होऊन त्याचा वापर औद्योगिक आस्थापना, नवउद्यमी आणि बाह्य वापरकर्त्यांना व्यापारी तत्त्वावर करणे शक्य आहे. या प्रकल्पांतर्गत जिल्हा, विभाग आणि केंद्रस्तरीय ड्रोन केंद्रांची निर्मिती करण्यात येणार आहे. राज्यात कृषी, आपत्ती निवारण, सर्वेक्षण, पुरवठा आणि वितरण अशा विविध क्षेत्रांत ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. महाराष्ट्र ड्रोन अभियान या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकारकडून २३८ कोटी ६३ लाख रुपयांचा निधी देण्यास मंजुरी देण्यात आली आहे. अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली आहे.राज्य सरकारने 'महाराष्ट्र ड्रोन मिशन' राबवण्यास मंजुरी दिली आहे. त्या अंतर्गत राज्यात ड्रोन केंद्रांचे जाळे निर्माण करण्यात येणार असून, सहा विभागीय आणि बारा जिल्हास्तरीय ड्रोन केंद्र निर्माण केली जाणार आहेत. या ड्रोन केंद्राचे मुख्यालय आयआयटी मुंबईमध्ये उभारले जाणार आहे.

# दोन एक्स्प्रेस गाड्यांना कर्जत, लोणावळ्यात थांबाही सुरू

## अखेर लोणावळा लोकल दुपारी धावली!

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शिवाजीनर-लोणावळा लोकल सेवा आता दुपारच्या वेळेतही सुरू राहणार आहे. केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी या दुपारच्या लोकलला बुधवारी हिरवा झेंडा दाखविला. यामुळे आता या मार्गावरील प्रवाशांची सोय होणार आहे. याआधी या मार्गावर दुपारी तीन तास लोहमार्गाच्या देखभाल आणि दुरुस्तीसाठी ही सेवा बंद ठेवली जात होती. केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री दानवे यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे लोणावळा स्थानकावरून गाडीला हिरवा झेंडा दाखविला. पुणे विभागाचे अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक ब्रिजेशकुमार सिंह, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक डॉ.मिलिंद हिरवे, वरिष्ठ विभागीय अभियंता मनीषकुमार सिंह आणि मुंबई विभागाचे अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक अमरेंद्र सिंह उपस्थित होते. पुणे-लोणावळा दरम्यान





लोकलच्या दिवसभरात ४० फेऱ्या होतात. या लोकलने दररोज ६० हजार प्रवासी प्रवास करतात. पुणे-लोणावळा लोकल सेवा सकाळी ११.१५ ते दुपारी ३ या काळात तर लोणावळा-पुणे लोकल सेवा सकाळी १० ते दुपारी २.५० या कालावधीत बंद ठेवली जात होती. यामुळे दुपारी या मार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांची गैरसोय होत होती. त्यात प्रामुख्याने विद्यार्थ्यांचा समावेश होता. महाविद्यालये दुपारी सुटतात अशा विद्यार्थ्यांना लोकलसाठी काही तास स्थानकावर प्रतीक्षा करीत थांबावे लागत होते अथवा इतर पर्यायांचा प्रवासासाठी वापर करावा लागत होता. आता त्यांची दुपारच्या लोकलमुळे प्रवासाची सोय होणार आहे.याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई – चेन्नई एग्मोर – छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई या एक्स्प्रेसला लोणावळा स्थानकावर थांबा देण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई- भुवनेश्वर -छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई या कोनार्क एक्स्प्रेसला कर्जत स्थानकावर थांबा देण्यात आला आहे.शिवाजीनर-लोणावळा लोकल सेवा आता दुपारच्या वेळेतही सुरू राहणार आहे. केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी या दुपारच्या लोकलला बुधवारी हिरवा झेंडा दाखविला. यामुळे आता या मार्गावरील प्रवाशांची सोय होणार आहे.